म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२४६

स्वामी महाराज प्रसन्न ॥

## श्रीसद्गुरु अक्कलकोट स्वामी महाराज

# मानसपूजा व स्तोत्र



अनन्य चिंतन । करिती जे जन
स्वामी दयाघन । तयापाठीं ॥ १ ॥

REFBK-0020236
REFBK-0020236


प्रतिभानुज —

विनामूल्य

या ग्रंथाचे सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन


卐

प्रकाशक : ए. एम्. नांदोडकर, अन्नपूर्णा निवास, दीक्षित क्रॉस रोड नं. २.
विलेपारले, मुंबई ५७.
मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४.



राजाधिराज योगिराज श्रीस्वामीसमर्थ अक्कलकोट महाराज समाधी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०२३८



राजाधिराज योगिराज श्रीस्वामीसमर्थ अक्कलकोट महाराज

# प्रकाशकाचे पान

श्रीसद्गुरु अक्कलकोट स्वामीमहाराज 'मानसपूजा व स्तोत्र' हें पुस्तक प्रसिद्ध करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. या पुस्तकांतील मानसपूजा हा विभाग प्रथमच प्रसिद्ध होत आहे. तसेंच 'श्रीगुरु भूपाळी', 'श्रीस्वामीराजस्तवन' व 'आरती श्रीस्वामींची' हा भाग प्रथम प्रसिद्ध होत आहे. या पुस्तकांतील स्तोत्र या विभागाचें प्रकाशन पूर्वीं झालेले आहे.

या प्रकाशनकार्यासाठीं श्री स्वामी समर्थांच्या ज्या प्रेमळ भक्तांनीं अत्यंत आत्मीयतेनें यथाशक्ति देणगी देऊन साहाय्य केलें त्या सर्वांचे मी हार्दिक आभार मानतों. त्याचप्रमाणें पुस्तकांतील ब्लॉककरितां ज्यांनीं छायाचित्रें दिलीं त्यांचेही, व त्याचप्रमाणें ज्यांनीं ब्लॉक तयार करून दिले त्यांचेही आभार मानतों. त्याचप्रमाणें अल्प वेळांत सुबक मुद्रण, व बांधकाम करणारांचेही आभार मानतों—तसेंच ज्यांनीं ज्यांनीं ह्या ग्रंथरचनेसाठीं प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रीतीनें हातभार लावला त्या सर्वांचे आभार मानतों. शेवटीं ज्या दीनदयाळू स्वामी समर्थांच्या कृपेनें व आशीर्वादानें हें मनीं योजिलेलें कार्य सिद्धीस गेलें त्यांच्या चरणकमळीं मस्तक ठेवून मीं आपले सर्वांचे हार्दिक आभार मानतों.

समर्थांचा हीन दीन अज्ञानी दास

—नांदोडकर

REFBK-0020236
REFBK-0020236

## श्रीस्वामीराजस्तवन

जयत्कार ! गर्जतो सद्‌गुरु स्वामी नारायणा !
प्रभातकालीं स्तविति अहर्निश दर्शन देइं जना ।। ध्रु० ।।

चराचरातुन ध्वनी निनादे उमटे ॐकार
पशुपक्षीही गाती गाणी काढुनी मंजुस्वर ।। २ ।।

जळीं स्थळीं तूं व्यापुनी उरला नामरूपी नटला
नाना नामें जपती जनगण हांकारती गुरुला ।। ३ ।।

भावफुलांची माला घेऊन भक्त आला दारीं
प्रेमाश्रूनें पदप्रक्षाळुन नमिती चरणावरी ।। ४ ।।

ऐसा येई, धांवुन आतां दत्ता नारायणा !
प्रतिभानुज परि लीन अहर्निश सद्‌गुरुच्यां चरणां ।। ५ ।।

□ □ □

## श्री स्वामी समर्थ ।

श्री. देशपांडे यांचा जन्म सद्गुरुपरंपरेतला आहे. श्री. देशपांडे यांनीं मला सांगितले कीं त्यांच्या वडिलांच्या घरीं एका रात्रीं परम-पूजनीय सीतारामबुवा आले, व त्यांनीं भिक्षा मागितली. त्यांच्या वडिलांनीं महाराजांना भिक्षा दिली. परत प्रसाद म्हणून सीताराम महाराजांनी त्यांच्या झोळींतून दोन लिंदा काढून त्यांना दिल्या. नंतर श्री. देशपांडे यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच ईश्वरनिष्ठा दिसत होती. आतां तर त्यांची स्थिती पूर्ण शरणागतीची असून तद्रूपच आहे. त्यांच्याकडून जें कांहीं कार्य घडत आहे तें सर्व स्वामीस्वरूपच होय.

—नांदोडकर

□ □ □

श्रीगुरुदेवदत्त !

# अघटित घटना

सुमारें ८ वर्षांपूर्वीची घटना ! मी गाणगापुरीं जाऊन दर्शनोत्सुक आर्ततामनी–सतत श्रीस्वामी नाम घेत होतों. तसाच अक्कलकोटास आलों. वटवृक्ष मंदिरांत श्री गुरुस्तोत्राचें पठण करून तसाच श्री. जोशीमठ अक्कलकोट येथें दर्शनासाठीं जाण्याची बुद्धि झाली. श्रीगुरुदर्शनाची मनोमन तळमळ होती. त्याच वेळीं जोशी मठांत श्रीगुरूच्या पादुकांचें दर्शन घेतलें व निघालों. तोंच तिथें श्रीगुरूच्या सानिध्यांत रममाण होणारे श्री. नांदोडकर यांनीं बोलावलें व स्वतःची मधुकरी श्रीगुरुप्रेरणेनें व कृपेनें मला दिली ! तो अमृतमय प्रसाद व दोघांची भेट घडवून आणणारा तोच श्रीगुरु समर्थ होय ! पुनश्च या कालावधीनंतर प्रस्तुत श्री. नांदोडकर मुंबईत व मी पुण्यांत–पण पुन्हा श्रीगुरुप्रेरणेनें या प्रकाशनाचें तात्कालिक कारण पुढें करून पूर्वीच्या भेटीस उजळा दिला.

—प्रतिभानुज देशपांडे

◻ ◻ ◻

# श्रीगुरु - भूपाळी

उठा! उठा! स्वामीराजा, जाहला अरुणोदय आतां
रविकिरणांनीं दिशा उजळल्या, दर्शन द्या दत्ता ॥ ध्रु. ॥

उद्यानांतरि फुलें सुगंधित, सेवेस्तव फुललीं
जगजीवन तूं, तुजसाठीं ही गंगा अवतरली ॥ २ ॥

सर्वाठायीं भरूनी उरला दशांगुळें राया
दिवस-रात्र-अन् सुखदुःखेंही केवळ तव माया ॥ ३ ॥

अमल-विमल तूं त्रिभुवनसुंदर रविशशी तववदनीं
सगुणस्वरूपा बघावयासी येती देवमुनी ॥ ४ ॥

विश्वव्यापका, बुद्धीदाता – तूचि माता-पिता
प्रतिभानुज तव चरणांवरती ठेवितसे माथा ॥ ५ ॥

□ □ □

## श्री स्वामीसमर्थ

ॐ

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलंज्ञानमूर्तिम् ।
द्वन्द्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादि लक्ष्यम् ।।

एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ।।

श्रीगणेशाय नमः । श्री स्वामीसमर्थाय नमः ।
श्री कुलदेवताभ्यो नमः । श्री मातापितृभ्यां नमः ।

आधी नमूं सद्गुरुनाथा । तूं चि सर्व कर्ता हर्ता ।
भक्तवत्सला कृपावंता । शब्दातीत नमस्तुभ्यम् ।। १ ।।

तूंचि विधी हरिहरमूर्ती । नामनृसिंहसरस्वती ।
श्रीपादवल्लभयती । स्वामी समर्था तूं चि बा ! ।। २ ।।

करुणाघन जगत्चालका । सर्वात्मक विभूषका ।
अनंतकोटिब्रह्माण्डनायका । भक्तसखा स्वामिराज ।। ३ ।।

श्रीस्वामीराया आतां । यावें अन्तःकरणीं ।
विनंती असे चरणीं । दासाचिया ।। ४ ।।

दत्तगुरु स्वामी । ऐसा तूं प्रेमळा ।
कृपाळू गोपाळा । येई वेगे ॥ ५ ॥

मानसपूजना । करी आवाहन ।
दाखवी चरण । गुरु माई ॥ ६ ॥

नित्य निरंजन । सगुण निर्गुण ।
स्वामी नारायण । जगदीशा ॥ ७ ॥

मन सिंहासनी । आसनी स्थित ।
तुष्ट करी चित्त । बाळकांचें ॥ ८ ॥

हृदयीं स्थिरावली । मूर्ति मनोहर ।
झालासी साकार । भक्तासाठीं ॥ ९ ॥

मन औदुंबर । स्वामी आत्मरूप ।
तेजस्वी स्वरूप । देखियलें ॥ १० ॥

देखियले गुरु । हरलें देहभान ।
आलासी धांवूनी । भक्तापाठी ॥ ११ ॥

करीतसे पूजा । होऊनी उन्मन ।
गुरु समचरण । प्रक्षाळितो ॥ १२ ॥

शोभतात कर्णी । कुंडले सुंदर ।
कंठी रुद्रहार । रुळतसे ॥ १३ ॥

भक्ती पंचामृतें । घालुनिया स्नान ।
मंगल गायन । करी मन ॥ १४ ॥

२०२३५

कस्तुरीची उटी । सेवेचे चंदन ।
ललाट भूषण । भूषविते ॥ १५ ॥

भाव पुष्प-माला । श्वास-धूप-गंध ।
सद्गुरु स्वानंद । जीवनांत ॥ १६ ॥

होऊनिया आर्त । गायिली आरती ।
शब्द रूपयती । स्वामी माझा ॥ १७ ॥

जय जय सर्वज्ञा । चित्तगुण प्रज्ञा ।
शिरसावंद्य आज्ञा । मानी ब्रह्मा ॥ १८ ॥

जयजयाजी अविनाशा । कल्पद्रुम सर्वेशा ।
मायातीता परमेशा । प्रगटलासी ॥ १९ ॥

जयजयाजी अत्रिनंदना । ब्रह्मा-विष्णु-पार्वतीरमणा ।
तूंचि ब्रह्म-सनातना । गुरुराया ॥ २० ॥

भक्तकामकल्पद्रुमा । म्हणती तुज नारायणा ।
स्वामी दयाघना । गुरुराया ॥ २१ ॥

पतीतपावन । ऐसी तुझी कीर्ती ।
प्रज्ञापुरी वसती । असे सदा ॥ २२ ॥

प्रज्ञारूप स्वामी । असे अंतर्यामी ।
भक्त रंगे नामी । अहर्निश ॥ २३ ॥

नामस्मरणाचा । लागलासे छंद ।
तुटती ते बंध । विकाराचे ॥ २४ ॥

सरले ते विकार । झालों तदाकार ।
महिमा अपरंपार केवि वर्णू ।। २५ ।।

नयनासी लागे । छंद दर्शनाचा ।
स्वामी स्वरूपासी । निहाळीलें ।। २६ ।।

विश्वरूप गुरु । जाहला साकार ।
नाद चि ॐकार । निनादला ।। २७ ।।

चराचर सारे । व्यापुनिया उरला ।
अंतरांत नटला । गुरुराज ।। २८ ।।

आतां काय मागूं । तुजसी स्वामिराया ।
विनवितसे पाया । दास तुझा ।। २९ ।।

घडो ऐसे देवा । जन्मजन्मांतरी ।
आंस न श्रीहरी । दुजी आतां ।। ३० ।।

न लगे अन्य कांहीं । आतां स्वामीराया ।
घडों सेवा सदया । जीवनांत ।। ३१ ।।

सारें कांहीं दिलें । तुवां गुरुदेवा ।
घडो नित्य सेवा । स्वामीराया ।। ३२ ।।

माझी सर्व चिंता । वाहसी अनंता ।
ध्येय-ध्यान-ध्याता । सारें तूंचि ।। ३३ ।।

परिसावी विनंती । आलो काकुळती ।
असू द्यावी प्रीती । भक्तावरी ।। ३४ ।।

अनन्य चिंतन । करिती जे जन ।
स्वामी दयाघन । तयापाठीं ॥ ३५ ॥

मानस पूजन । स्तोत्राचें पठण ।
मुखीं स्वामीगुण । आठवावे ॥ ३६ ॥

उपासका व्हावें । आतां सावधान ।
सद्गुरु कीर्तन । सोडूं नये ॥ ३७ ॥

लाभेल संपत्ती । सौख्य–शांति–घरीं ।
लक्ष्मी वास करी । अखंडित ॥ ३८ ॥

स्वामी नाम घेतां । लाभे योगक्षेम ।
भक्त कल्पद्रुम । स्वामी माझा ॥ ३९ ॥

ऐसा श्रीगुरुदातार । भक्तजनासी आधार ।
करूं चला जयजयकार । श्रीगुरुस्वामी समर्थ
जय जय स्वामी समर्थ ॥ ४० ॥

लागते समाधि । गुरुगुण गातां ।
निजानंदे रंगता । धन्य होय ॥ ४१ ॥

स्वीकारिती पूजा । मिळे आत्मानंद ।
गुरुपद आनंद । वर्णवेना ॥ ४२ ॥

षोडशोपचारें । केली मानसपूजा ।
जोडियल्या भुजा । गुरुपायीं ॥ ४३ ॥

विश्वाची माउली । भक्तांची सावली ।
रक्षण्या धावली । सत्वर ती ॥ ४४ ॥

गुरुकृपा बळ । लाभतां जीवनीं ।
सुखचिंतामणि । दूर नाही ।। ४५ ।।

समर्थांचा समर्थ । ऐसा कीर्तिवंत ।
पुरती मनोरथ । नाम घेतां ।। ४६ ।।

ऐसी गुरुमूर्ति । लाभे मजप्रती ।
राहे सदा चित्तीं । स्वामीराज ।। ४७ ।।

गुरुकृपा होतां । काय उणें जगीं ।
अष्टसिद्धी मार्गीं । ओळंगती ।। ४८ ।।

परब्रह्म जैसे । उभे विटेवर ।
तैसा गुरुवर । अंतर्यामीं ।। ४९ ।।

प्रतिभानू जासी । लाभला स्वानंद ।
स्वामीनामें धुंद । जीवनांत ।। ५० ।।

देह अवघे अक्कलकोट । आत्मरूपी स्वामी समर्थ ।
त्याचे चरणीं दंडवत । वारंवार घालू चला ।। ५१ ।।

□ □ □

## प्रार्थना

(शार्दूल विक्रीडित)

श्रीमन्मंगलमूर्ति सच्चित्घना-तूं कामकल्पद्रुमा ।
राजाधि अधिराज बोलति गुरु ब्रह्मांड पुरुषोत्तमा ॥

राखी ब्रीद सदैव 'वत्सल' असे हें मागणें प्रेमळा ।
या श्रीस्वामीसमर्थ दत्तगुरुला साष्टांग वंदूं चला ।

□ □ □

॥ श्रीसद्गुरु अक्कलकोटस्वामी समर्थ ॥

श्री गणेशाय नमः । श्री सरस्वत्यै नमः ॥

ॐ श्री सर्वशक्तिमूर्तये नमः। ॐ परात्पर जगत्गुरु नमो ॥ आता नमूं मयुरवाहिनी । जी सर्व सुखदायिनी ॥ जी शब्दविश्वाची स्वामिनी । वंदन करू या तियेसी ॥ १ ॥ जो सकल विश्वाचा आधार । निर्गुण आणि निराकार ॥ तो ब्रह्मा-विष्णु महेश्वर । सद्भावें वंदूं त्रैमूर्ती ॥ २ ॥ त्रैमूर्तींचा महिमा अपार । गुरुचरित्रीं वर्णिला साचार ॥ स्तुति करितां अपरंपार । वेद चारी शिणले ॥ ३ ॥ कर्दलवनीं झाले गुप्त । साक्ष ठेवून गाणग क्षेत्र ॥ निर्गुण पादुका पवित्र । भक्तासाठीं ठेवियल्या ॥ ४ ॥ पंढरिचा पांडुरंग । ज्यासी आवडे संतसंग ॥ तारिले तुक्याचे अभंग । त्यासीं प्रणिपात

अंतरीं ॥ ५ ॥ करूं या साष्टांग दंडवत । त्रैमूर्ती श्रीगुरु दत्त ॥ अक्कलकोटीं यति समर्थ । सद् भावें नमूं अंतरीं ॥ ६ ॥ आतां श्रीस्वामिरायाचें आख्यान । भाविकतेनें करा श्रवण ॥ सर्वसुखाचें निधान । लाभेल स्तवितां सर्वांसी ॥ ७ ॥ भक्ताचा करूनी सोहळा । दाखवी अगम्य लीला ॥ ऐसी ख्याति त्रैलोक्याला । मी पामर काय वर्णूं ॥ ८ ॥ नृसिंहसरस्वती गुरुस्वामी । गुप्त जाहले कर्दळवनीं ॥ येतां पुनश्च धर्मा ग्लानी । अक्कलकोटीं अवतरले ॥ ९ ॥ कर्दळवनीं गुप्त जाहला । अबू पहाडीं प्रगटला ॥ अवधूत मानवरूपें आला । अक्कलकोटीं माझारीं ॥ १० ॥ श्रीगुरुस्वामी यति पाहिला । मूर्तिमंत तेजाचा पुतळा ॥ कंठीं रुळती रुद्राक्षमाळा । पद्मासनीं स्थित असे ॥ ११ ॥ शांत गंभीर दिसे रूप । हेमसंकाश तनु अनुरूप ॥ नेत्रकमलांची कृपाझेंप । भक्तावरी सर्वदा ॥ १२ ॥ भालीं शोभे कस्तुरी तिलक । साजिरें दिसे नासिक ॥

ओष्ठ हनुवटी सुंदर मुख । चंद्रापरी दिसतसे ॥ १३ ॥ समुत्कंठ पाहूं चला । आजानुबाहू शिव भोळा ॥ कंठा भूषवी त्रिदलमाला । नृसिंहभान गुरुस्वामी ॥ १४ ॥ निम्ननाभी दिठी सुंदर । धूर्जटी कौपीन कटीवर ॥ दत्त नरहरी यतिवर । धींपुरी प्रगटलासे ॥ १५ ॥ अखिल विश्वीं विश्वंभरू । भक्तजन सुरतरू ॥ या हो सकल पादपद्म धरूं । देहबुद्धी करूं दूर ॥ १६ ॥ मम हृदयीं ठसो मूर्ति । शंख चक्रांकित गदा हातीं ॥ कामधेनुसह चतुर्वेद मूर्ती । सदैव राहो अंतरीं ॥ १७ ॥ अबू-गिरीवरुनी हृद्‌कमलीं । वेगें येई गुरुमाऊली ॥ रत्नखचित सिंहासनीं बैसली । भक्तकाज करावया ॥ १८ ॥ आतां करितों तुझी पूजा । रमावरा अधोक्षजा ॥ सप्रेमें क्षाळितो पदरजा । अर्घ्य देई स्वकरीं ॥ १९ ॥ मधुर सुवासिक शीतळ । गंगोदक जळनिर्मळ ॥ पंचामृत स्नान सचैल । निजहस्तें घालितों ॥ २० ॥

स्नान करुनी, करा आचमन । भरजरी पितांबर नेसुन ।। शालजोडी पांघरून । सुखें घेई स्वामिया ।। २१ ।। चंद्रोपम उपवीत घालुनी । रत्नाभरणें, कौस्तुभमणी ।। कस्तुरी टिळा लेवुनी । चंदन उटी लावावी ।। २२ ।। निराकार, निर्गुण गोपाळा । कंठा भूषवी तुलसीमाळा ।। बिल्व-शमी दूर्वांकुराला । सहस्रनामें अर्पितों ।। २३ ।। अष्टगंध, बुक्का सुगंध । सौरभें होती दिशा धुंद ।। अर्पितों दीप स्वानंद । मानुनी घेई गुरुराया ।। २४ ।। रत्नखचित चौरंगावरी । सुवर्णताटीं पक्वान्नें सारीं ।। दहिं-दूध लोणचें कोशिंबिरी । पंचखाद्य नैवेद्य सेवा जी ।। २५ ।। कर्पूरोदकें धुवोनि हस्त । घालितो करीं पंचामृत ।। प्राणापान, व्यान, उदान समस्त । तूंचि असती स्वामिया ।। २६ ।। गुरुमूर्ती तूं षड्रस । मीहि त्यांत ऐक्य सहज ।। दिव्य सच्चित् रूप निज । वेदपूर्ण भरले

असे ॥ २७ ॥ वदनसुवासा तांबूल । त्रयोदशगुणी निर्मळ ॥ मुखशुद्धीस नारळ ॥ घ्यावा आतां गुरुराया ॥ २८ ॥ भक्तवत्सला स्वामिराजा । अंगिकारावी माझी पूजा ॥ नमस्कारोनी अधोक्षजा । श्रीमुख बघतो न्याहाळुनी ॥ २९ ॥ तव आरती ओवाळितां । नासती अनंत ब्रह्महत्त्या । वेद बोलतो वाणी सत्या । त्रिवार ऐसें सत्यचि ॥ ३० ॥ सनकादिक मुनी सुरवर । करिती स्वामीचा जयकार ॥ मंत्रपुष्पांचा संभार । जडजीवासी उद्धरी ॥ ३१ ॥ वेदघोष अति सुस्वर । प्रदक्षिणा घालीं वारंवार ॥ प्रेमें साष्टांग नमस्कार । अनंतासी दंडवत ॥ ३२ ॥ अनंतकोटी ब्रह्मांडनायका । अनादि स्वरूपा गुरुराया ॥ लागलों आतां तव पायां । भक्तकृपाळा उद्धरी ॥ ३३ ॥ छत्रचामरें वारीन । गंधर्वगान समर्पिन ॥ सुस्वर वाद्यें वाजवून । तुष्ट करितों तुजलागीं ॥ ३४ ॥ सुदिव्य, सुखशय्या मृदुल । ठेवी सुखासनीं पदकमल ॥

चरण, अहर्निश चुरीन । सेवा मानून घ्यावी जी ॥ ३५ ॥ सत्शिष्य भजनीं रंगती । भजनानंदीं विसावती ॥ संतसंगीं जडो प्रीति । हेंचि मागणें स्वामिया ॥ ३६ ॥ शेष, व्यास, सरस्वती । गुणवर्णन करिती महामती ॥ भक्तस्तवन ऐकुनी श्रीपती । प्रसन्न व्हावें सत्वरीं ॥ ३७ ॥ विश्वंभर तूं सौख्यराशी । भक्तकौतुक पुरविशी ॥ योगक्षेम चालविसी । ऐसी ख्याती त्रिभुवनीं ॥ ३८ ॥ निजनिर्माल्य प्रसाद देसी । उच्छिष्ट आंस सर्वांसी । पूर्वपुण्यें येतीं फळासी । सेवा गुज ऐसें हें ॥ ३९ ॥ सृष्टि–उत्पत्ति–स्थिति-संहारा । अवतार तुझाचि गुरुवरा ॥ ब्रह्मा–विष्णु–महेश्वरा । स्वामीरूपीं शोभसी ॥ ४० ॥ रवि–चंद्रासी–तेजाळलें । तें तेजही तुजकडोनि आलें ॥ निज–भक्त–कार्य सगळें । तव प्रसादें लाभतें ॥ ४१ ॥ इह परत्र सौख्य देसी । कल्पतरूसम शोभसी ॥ जैसा भाव धरावा मानसीं । तैसा त्यासी अनुभव

॥ ४२ ॥ शिव–विष्णु–शक्ति–गणपति । स्वामीरूपें सारे शोभती ॥ निगमागमही स्तविती । सत्यज्ञानानंद तूं ॥ ४३ ॥ त्रिविधताप हे निवारिसी । दीनजना उद्धरिसी ॥ क्षमा करावी दासासी । मागणें हेंचि जीवनीं ॥ ४४ ॥ जीवात्मज्योति उजळुनी । तव प्रकाशें प्रकाशुनी ॥ पाहते नित्यचि स्तवनीं । स्वामीराजा ॥ ४५ ॥ ऐशी अतर्क्य स्वामी-लीला । वर्णितां वेदही शिणला । तेथे मज पामराला । कैसी शक्ती ॥ ४६ ॥ काया वाचा मानसीं । इंद्रिया धीकृत कर्मासी ॥ अर्पितों परात्परा तुजसी । सारी सेवा ॥ ४७ ॥ रामकृष्ण तूं सर्वसाक्षी । पृथ्वीवर अवतार घेसी ॥ हरावया भूभारासी । पंढरीं वास केला ॥ ४८ ॥ पंढरीस श्रीविठ्ठल । गिरीवर विष्णु सोज्वळ ॥ करवीरीं लक्ष्मी प्रेमळ । विश्वेश्वर काशीवासी ॥ ४९ ॥ कलियुगीं नृसिंह-सरस्वती । अत्रिनंदन गाणग क्षेत्रीं ॥

गुरु माणिक प्रभूही तूंचि । अक्कलकोटीं गुरुराया ॥ ५० ॥ जे भक्त तुजला भजती । अहर्निश राहे त्यांचे पाठी ॥ भक्त-संरक्षणासाठीं । अक्कलकोटीं वास केला ॥ ५१ ॥ स्तवितां ही स्वामीमाउली । पापें अनंत जन्माचीं जळालीं ॥ वाढविसी प्रेमसाउली । वात्सल्य नांदे सर्वदा ॥ ५२ ॥ असत्वृत्ति जावो विलया । सद्वृत्ति पावो जया ॥ सकलजनासी देवराया । सौख्य लाभो जगीं या ॥ ५३ ॥ गोवर्धन गिरी धरिसी । अग्निही तूं प्राशिसी ॥ पार्थगुरु सारथी होसी महीभार हरावया ॥ ५४ ॥ अविनाशी अवतार दत्त । जगतीं आहे विख्यात ॥ अघटित लीला दावित । गाणगापुरीं बैसला ॥ ५५ ॥ गुरुतत्त्व गूढ सार । जाणताती भक्त थोर ॥ तोचि प्रज्ञापुरीं यतिवर । भक्तकाजीं रंगला ॥ ५६ ॥ हें स्तोत्र करितां पठण । त्यासी न बाधे चिंता दारुण ॥ भवभय-

दुःखाचें निरसन । स्वामीकृपें होईल ॥ ५७ ॥ अनन्यभावें करा स्मरण । साक्षात्कारें घ्यावें दर्शन ॥ हेंचि सद्‌गुरुवचन । असत्य न होई सर्वथा ॥ ५८ ॥ ठेवुनियीं श्रद्धा भाव । मनीं आळवावा गुरुदेव ॥ भक्तापाठीं घेई धांव । रक्षणासी सिद्ध सदा ॥ ५९ ॥ वटवृक्षतळीं जाण । श्रीसद्‌गुरु प्रतिमा ठेवून ॥ यथासांग करावें पूजन । षोडशोपचारें आदरें ॥ ६० ॥ मग करावें स्तोत्र पठण । नित्यशः एक आवर्तन ॥ अखंड करितां तीनमास पूर्ण । साक्षात् सद्‌गुरु भेटेल ॥ ६१ ॥ श्रीस्वामीसमर्थ नाम । अनंतकोटींचा कल्पद्रुम ॥ सकल संतांचा विश्राम । नामस्मरणीं नांदतो ॥ ६२ ॥ स्वामीकृपा होतां क्षणीं । मुक्यातें फुटेल वाणी ॥ पंगू जाईल उलंघुनी । उत्तुंग गिरीहि लीलया ॥ ६३ ॥ ऐसा महिमा अगाध । एकमुखीं वर्णिती वेद ॥ श्रीस्वामीस्तोत्र केलें सिद्ध । आला धांवून झडकरीं ॥ ६४ ॥

स्वामी प्रेमळ माउली । जैसी वत्साते गाउली ॥ तुझीं स्तुतिस्तोत्रें गायिलीं । तव प्रेमळ कृपेनें ॥ ६५ ॥ तूंचि श्री व्यंकटेश । तूंचि महारुद्र महेश ॥ अनंतकोटी जगदीश । श्रीस्वामीसमर्था सर्व तूं ॥ ६६ ॥ उत्पत्ति, स्थिति आणि लय । तूंचि सकलांचा आशय ॥ गुरुदेवा तूंचि मम आश्रय । उपासका सांभाळी ॥ ६७ ॥ तंव करितां नामस्मरण । लाभे चित्ता समाधान ॥ तंव चरणासी वंदन । देवाधिदेवा समर्था ॥ ६८ ॥ जे नर करतील आवर्तन । मनकामना त्यांची होईल पूर्ण ॥ सद्भक्तीचें अधिष्ठान । नित्य ठेवूनी अंतरीं ॥ ६९ ॥ हा ग्रंथ ज्याचे घरीं । तेथें अन्नपूर्णा वास करी ॥ सुख संपत्ति संसारीं । लाभेल भाविकां निश्चिती ॥ ७० ॥ करितां ग्रंथाचें पठण । दुःख दारिद्र्य जाईल पळून ॥ भक्त-सेवेसाठीं येईल धांवून । दयावंत स्वामीराज ॥ ७१ ॥ येथें ठेवुनियां विश्वास । करावें ग्रंथ पाराय-

णास ॥ दृष्टान्त देवोनि त्वरेस । सांभाळीन तयालागीं ॥ ७२ ॥ हें सद्गुरूचें सत्यवचन । श्रोते ऐका ध्यान देऊन ॥ पुरवील मोक्ष-साधन । एकचि माझा स्वामीराज ॥ ७३ ॥ विश्वामित्र गोत्र कुलोत्पन्न । देशपांडे उपनामा-भिधान ॥ नाम माझें असे वामन । सद्गुरु-चरणीं लीन सदा ॥ ७४ ॥ प्रतिभानुज हें संबोधन । घेतलें श्रीगुरूनें लिहवून ॥ झाली सेवा सफल पूर्ण । पूर्व सुकृतानुसार ॥ ७५ ॥ स्तुतिस्तोत्राचा गुंफिला हार । भक्तिमंजिरी त्यावर ॥ घातली वैजयंती सुंदर । कंठीं श्रीगुरुरायाचे ॥ ७६ ॥ श्रीस्वामीराज स्तोत्र ग्रंथ । जाहला असे समाप्त ॥ मज पामरें वदविलें गुरुनाथें । त्यांचे चरणीं दंडवत ॥ ७७ ॥ श्रीस्वामी समर्थ दत्त । मंत्र हा मनीं घोषित ॥ झालें चित्त अवघें तृप्त । पुनश्च चरणीं दंडवत ॥ ७८ ॥ देह अवघें अक्कलकोट । आत्मस्वरूपी स्वामीसमर्थ ॥

त्यांचे ठायीं दंडवत ॥ वारंवार घालीतसे ॥ ७९ ॥
इति श्रीस्वामीराज सगुण । भक्तांचें वैभव पूर्ण ॥ प्रतिभानुज करीतसे वर्णन । साष्टांग प्रणिपात करोनी ॥ ८० ॥

॥ श्रीस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ इति श्रीअक्कलकोटस्वामीसमर्थ स्तोत्र संपूर्णम् ॥

॥ शुभंभवतु ॥

REFBK-0020236
REFBK-0020236
20236

## आरती श्रीस्वामींची

आरती नारायणा ! दावी चरण दीना
सच्चिदानंदघना—स्वामी येऊद्या करुणा ॥ धृ० ॥

अवधूत चिंतन तूं—तुझे ठायी माझा हेतू
ज्ञानरूप नारायणा ॥ धृ० ॥

जनगण येति बहुत—होती दृष्टांति तुष्ट
लागती तव चरणा !

आधि-व्याधि निवारुनी—मार्ग दाखवी जना
उद्धरावे सेवकांना !

प्रेमळ गुरुरावा—घडो अनन्य सेवा
हेचि देई आता दान !

मागणे एक अंती—वास राहो नाम चित्तीं
—स्वामी सद्गुरू नारायणा—॥ धृ० ॥

□ □ □